**डिजीटल स्वाक्षरी डेटाबेस आधारीत संगणकीकृत अधिकार अभिलेखास (मिळकत पत्रिका, फेरफार, व इतर संगणकीकृत तयार होणारे दस्तऐवज) कायदेशीर वैधता देण्यासंदर्भात क्षेत्रिय महसूली प्राधिकारी व अधिकारी यांना निर्देश देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०२२/प्र.क्र.१९९/ल-१.**
मुख्य इमारत, पहिला मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ६ डिसेंबर, २०२२.

<u>वाचा</u> :- १. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. राभूअ-२०१६/प्र.क्र.३५०/ल-१, दिनांक ३१.०३.२०१७.
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. राभूअ-२०१९/प्र.क्र.२८९/ल-१, दिनांक २.७.२०२२.
३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे याचे क्र. ना.भू.-१, /ePCIS/डिजीटल स्वाक्षरी/२०२२, दि.२१.०२.२०२२ चे पत्र.

**<u>प्रस्तावना</u> -**

संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील नगरभूमापन झालेल्या भागात मिळकत पत्रिकांच्या व्यवस्थापनाकरीता ई-प्रॉपर्टी कार्ड इन्फॉरमेशन सिस्टीम (e-PCIS) प्रकल्प राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच ई-प्रॉपर्टी कार्ड इन्फॉरमेशन सिस्टीम (e-PCIS) अंतर्गत देण्यात येणाऱ्या संगणकीकृत मिळकत पत्रिकांची नक्कल फी संदर्भाधिन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आली आहे. सर्व नगर भूमापन अधिकारी/उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालयात e-PCIS आज्ञावलीचे सहाय्याने ऑनलाईन फेरफार घेण्याची कार्यवाही सुरु झाली आहे. तसेच १) खरेदी २) बक्षिसपत्र ३) हक्कसोड ४) वाटप ५) भाडेपट्टा ६) बोजा दाखल करणे ७) बोजा उतरवणे च्या नोंदणीकृत दस्ताच्या आधारे ऑनलाईन फेरफार (Auto Trigger Mutation) घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. डिजीटल स्वाक्षरीत अद्यावत संगणकीकृत मिळकतपत्रिका जनतेसाठी महाभूमि संकेतस्थळावर उपलब्ध होतात. फेरफार प्रक्रियेच्या अनुषंगाने संगणकीकृत तयार होणारे दस्तावेज उदा. फेरफार, परिशिष्ट-अ व ब, नमुना-९ ची नोटीस व इतर संगणकीकृत तयार होणारे दस्तावेज इत्यादी डिजीटल डेटाबेस आधारित संगणकीकृत अधिकार अभिलेखास कायदेशिर वैधता देण्याबाबत क्षेत्रिय महसूली अधिकारी व संबंधित प्राधिकारी यांना निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन परिपत्रक :-**

माहिती व तंत्रज्ञान अधिनियम, २००० च्या कलम ४, ५, ६, ७ व ८ मधील तरतूद आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवहया (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम,१९७१ व महाराष्ट्र जमीन महसूल (गाव, नगर व शहर भूमापन) नियम १९६९ मधील तरतुदीनुसार, प्राप्त अधिकारात क्षेत्रीय महसूली यंत्रणा व प्राधिकारी आणि संबंधित सक्षम प्राधिकारी यांना खालीलप्रमाणे दिशानिर्देश देण्यात येत आहेत.

१. शासनाच्या महाभूमि पोर्टलवर https://mahabhumi.gov.in या संकेतस्थळावरुन व भूमि अभिलेख विभागाचे अधिकृत संकेतस्थळावरुन उपलब्ध होणारे क्यु आर कोड (QR CODE) व १६ अंकी पडताळणी क्रमांक असलेले डिजीटल स्वाक्षरीत डेटाबेस आधारित संगणकीकृत मिळकत पत्रिका, (Digitally Signed Property Card) उतारा तसेच डिजीटल स्वाक्षरीत फेरफार नोंदवही व अनुषंगीक अभिलेख (फेरफार, परिशिष्ट-अ व ब, नमूना-९ ची नोटीस, नमूना-१२ ची नोटीस इ.) सर्व कायदेशीर व शासकिय/निमशासकिय कामकाजासाठी वैध राहतील.

२. अशा डिजिटल स्वाक्षरीत डेटाबेस आधारित संगणकीकृत मिळकतपत्रिका, फेरफार नोंदवहीचा उतारा तसेच e-PCIS आज्ञावलीद्वारे तयार होणारे दस्तऐवज यावर परिरक्षण भूमापक, निमतानदार,नझूल परिरक्षण भूकरमापक, मुख्यालय सहायक अथवा अन्य कोणत्याही अधिका-याची (शाईची/हस्ताची) स्वाक्षरी असण्याची आवश्यकता नाही.

३. दिनांक ०१.०१.२०२३ पासून मिळकत पत्रिकेची हस्तलिखित व फोटोकॉपी प्रमाणीत नक्कलांचे वितरण पूर्णत: बंद करण्यात येत आहे. त्यामुळे मिळकतपत्रिकेची हस्तलिखित व फोटोकॉपीची प्रमाणीत नक्कल दिनांक ०१.०१.२०२३ पासून देण्यात येऊ नये.

४. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांचेमार्फत “e-PCIS आज्ञावली” विकसित करणेत आली आहे. या आज्ञावलीद्वारे नगर भूमापनाकडील फेरफार संगणकाद्वारे ऑनलाईन घेण्यास मान्यता देण्यात येत असून दिनांक ०१.०१.२०२३ पासून हस्तलिखित फेरफार पद्धती पूर्णपणे बंद करण्यात येत आहे.

०२. सर्व उपसंचालक भूमि अभिलेख, जिल्हा अधिक्षक,भूमि अभिलेख व क्षेत्रीय महसूली व भूमि अभिलेख प्राधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांनी या परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी.

०३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२२१२०६१७३९३७३५१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAGWAN MARUTI SAWANT

Digitally signed by BHAGWAN MARUTI SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8ee89eb0aec64f8bc0bdf8d85ddb4706d35abd8b73c618e114ee98d5c9ecf57b, pseudonym=6A69B309A6281D99F5A420A268723ECE6A8B4A60, serialNumber=C7DBA1C6B5F7AB2A6CABC4F7EAD8CFA74F8F7A0FADCAC76D8F1CF22569F16BD3, cn=BHAGWAN MARUTI SAWANT
Date: 2022.12.06 17:44:46 +05'30'

**(भगवान सावंत)**
**अवर सचिव**

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
४. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, (१) मुंबई.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य, (२) मुंबई.
९. जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख (म.रा.) पुणे.
१०. सर्व विभागीय आयुक्त.
११. सर्व जिल्हाधिकारी.
१२. सर्व उपसंचालक, भूमी अभिलेख.
१३. सर्व जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख.
१४. सर्व उप जिल्हाधिकारी/सर्व उपविभागीय अधिकारी.
१५. सर्व तहसिलदार.
१६. सर्व उप अधिक्षक, भूमी अभिलेख.
१७. निवड नस्ती (ल-१).

To direct the Regional Revenue Authorities
and Officers to give legal validity to computerized.
record of rights (acquisition papers, alterations, and
other computer-generated documents)
based on digital signature database.

**Government of Maharashtra**
**Revenue and Forestry Division**
**Govt Padarpik Nos: Land- 2022/P.No. 199/L-1**
**Main Building, First floor, Martyr Rajguru Chowk,**
**Madam Kama Marg, Mantralaya, Mumbai – 400 032**
**Date: 6 December, 2023**

Read:

1) Revenue and Forest Department, Government Resolution no. राि‌अू-२०१६/प्र.क्र.३५०/ल-१, dated 31 March 2017
2) Revenue and Forest Department, Government Resolution no राि‌अू-२०१९/प्र.क्र.२८९/ल-१, dated 2 July 2022
3) Letter dated 21 February 2022 (Letter no N.M.-1/ePCIS/डिजीटल स्वाक्षरी/२०२२) of Jamabandi Commissioner and Director, Land Records, State of Maharashtra, Pune.

**Introduction:**

As per Government Decision No. 1 under reference, implementation of e-Property Card Information System project for the management of income tracts in urban land survey areas of the state has been approved. Also, the fee for duplicating the computerized income papers issued under the e-Property Card Information System has been prescribed by Government Decision No. 2 under reference. All City Land Survey Officers/Deputy Superintendents, Land Records Offices have started the process of online manipulation with the help of orders. Also 1) Purchase 2) Prize certificate 3) Release of rights 4) Allotment 5) Lease 6) Filing of encumbrance 7) On the basis of registered deed of discharge of encumbrance online modification process has been initiated. Digitally signed up-to-date computerized result sheets are available to the public on the Mahabhumi website. It was under the consideration of the Government to direct the Regional Revenue Officers and concerned authorities to give legal validity to the digital database based computerized records of rights such as documents generated in accordance with the conversion process, e.g. conversion, Annexure-A and B, Notice Form-9 and other computerized documents etc. The government has taken the following decision in this regard.

**Government Circular:**

The provisions of Sections 4, 5, 6, 7 and 8 of the Information and Technology Rules, 2000 and the Maharashtra Land Revenue Code, 1966 as well as the Maharashtra Land Revenue Rights Records and Registers (Preparation and Maintenance) Rules, 1971 and the Maharashtra Land Revenue (Village, Town, and City Land Survey) Rules, 1969, the powers vested in the Zonal Revenue System and Authority and concerned Competent Authority are being directed as under

1. Modification of database based computerized income slip, transcript and digital signature with QR code and 16 digit verification number available on Mahabhumi Portal of Government (https://mahabhumi.gov.in) and official website of Land

Records Department Registers and ancillary records (Amendments, Examinations-A and B, Form-9 Notice, Form-12 Notice, etc.) shall remain valid for all legal and Government/Semi-Government functions.

2. Such digital signature does not require the signature (ink/hand) of the Surveyor, Nimtandar, Nazul Surveyor, HQ Assistant or any other officer on the database based computerized income statement, copy of alteration register as well as the documents prepared by the order.
3. From 01.01.2023, distribution of handwritten and photocopied certified copies of income slips is being stopped completely. Therefore, handwritten and certified copy of income slip should not be given from 01.01.2023 onwards.
4. “e-PCIS Mandate” has been developed by National Center for Information Science, Pune. Through this order, the correction from the City Land Survey is approved to be done online through the computer and the manual correction method is completely abolished from 01.01.2023.

All Deputy Directors Land Records, District Superintendents, Land Records and Zonal Revenue and Land Records authorities, officers and employees should strictly implement this circular.

The said government circular has been made available on the website ww.maharashtra.gov.in of the Government of Maharashtra and its circular number is 202212061739373591. This order is digitally signed.

By order and in the name of the Governor of Maharashtra

**Bhagwan Maruti Sawant**
**Under Secretary**